بِسْمِ اللّٰہِ الرَّحْمٰنِ الرَّحِیْمِ نَحْمَدُہٗ وَنُصَلِّیْ عَلٰی رَسُوْلِہِ الْکَرِیْمِ وَعَلٰی عَبْدِہِ الْمَسِیْحِ الْمَوْعُوْدِ

لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوْلُ اللّٰہِ

دفتر مجلس انصاراللہ بھارت

Office Of The Majlis Ansarullah Bharat

Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA



Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in | محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)


# जमाअत अहमदियावर परमेश्वराची कृपा, आशीर्वाद आणि सहाय्यतेचे श्रद्धावर्धक प्रसंगवर्णन

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक ११ ऑगस्ट २०२३, मशिद मुबारक, टिलफोर्ड

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔ بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ۔ اِيَّاكَ نَعْبُدُ وَاِيَّاكَ نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔ صِرَاطَ الَّذِيْنَ اَنْعَمْتَ عَلَيْهِمْ ۙ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ۔

तशहहुद, तआवुज आणि सुरह फातिहाच्या पठणानंतर, हुजूर अनवर म्हणालेः अल्लाहच्या वचनानुसार, पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या खऱ्या दासाच्या पंथावर परमेश्वर दररोज आपली कृपावर्षा करत असतो. त्यांच्यापैकी काहींचा उल्लेख वार्षिक सम्मेलनाच्या अहवालात प्रस्तूत केले जाते आणि क्वचित समयात त्या सर्वांचे अवलोकन करणे अशक्य आहे म्हणून आजही त्यापैकी काहीं प्रसंगांचा मी उल्लेख करेन.

किन्शासाचे स्थानिक मिशनरी हमीद साहिब लिहितात की वेरा शहरातील आमचा रेडिओ कार्यक्रम ऐकल्यानंतर स्थानिक मशिदचे इमाम इसा साहिब स्थानिक यांनी स्थानिक जमाअतशी संपर्क साधला आणि मिशन हाऊसमध्ये आले, आमचा संदेश समजून घेतला आणि दीक्षा घेतली. नंतर त्यांनी आपल्या गावी जाऊन प्रचार केला आणि चोवीस लोक अहमदियामध्ये दाखल झाले. नंतर आमच्या धर्मोपदेशकाने त्या गावाला भेट दिली आणि आणखी आठ लोक जमाअतमध्ये सामील झाले आणि अशा प्रकारे तेथे एक नवीन जमाअत स्थापन झाली.

उमर मनूर मुअल्लीम साहेब यांना किन्शासा प्रांतातील मायेन डोम्बे या गावात प्रचारासाठी पाठवण्यात आले होते. तिथे त्यांनी पत्रिका वाटल्या. त्यादरम्यान काही दुष्ट लोकांनी दगडफेक केली आणि आरडाओरडा केला. मुअल्लीम साहेब दगडफेक टाळत उपदेश करत राहिले. लोक त्यांचा संयम आणि सहिष्णुता पाहून खूप प्रभावित झाले. तेथे मशिदीत जाऊन त्यांनी लोकांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली. या प्रचार अभियानातून बेचाळीस लोकांनी दीक्षा घेतली केली आणि एका नवीन ठिकाण्यावर जमाअतची नीव ठेवण्यात आली.

गिनी-बिसाऊचे इमाम तमाने म्हणतात की आजपर्यंत आम्ही जमाअतबद्दल ऐकत आलो आहोत की ते पवित्र प्रेषित (स.) आणि कुरआन आणि हदीसवर विश्वास ठेवत नाहीत. आज आम्ही तुमच्या खलिफा साहेबाना सम्मेलनामध्ये पाहिलं आणि ऐकलं.

त्यांनी अल्लाह, पवित्र पैगंबर (स.), कुरआन आणि हदीसमधून उपदेश दिले. माझी खात्री आहे की जमाअतच्या विरोधात खोटा प्रचार केला जातो आणि खोटा प्रचार हा नेहमीच ईश्वरीय समुयादायविरुद्ध रचला जातो. त्यामुळे मी आजपासून अहमदिया जमातमध्ये सामील होत आहे.

बुरुंडीमधील एका शहरातील एका सुन्नी मशिदीच्या इमामाने जमाअतची मशीद बंद करण्याचा खूप प्रयत्न केला, परंतु त्याच्या हाती अपयश लागले. आमच्या मुअल्लीम साहेबाना बोलावण्यात आले आणि येशू ख्रिस्ताच्या मृत्यूबद्दल चर्चा सुरू झाली. आमच्या मुअल्लीम साहेबाने युक्तिवाद केला तेव्हा त्यांना परास्त करण्यासाठी त्यांच्याकडे कोणताच उत्तर नव्हता आणि त्यांनी जमाअतवर अविश्वासाचा (काफिर) फतवा लावला. त्यातील एक म्हणालाः जमाअतचा इस्लाम सोपा आणि सरळ आहे ज्यामुळे त्याला समजण्यात कोणतीही अडचण नाही पण तुमचा मात्र समजत नाही. यावर त्यांचे एकमेकांशी भांडण झाले आणि सरकारने त्यांची मशीद तीन महिन्यांसाठी बंद केली. आता पाकिस्तानचे हे मार्ग इतर विभागातील तथाकथित विद्वान अहमदींच्या मशिदी बंद करण्यासाठी किंवा मिनार आणि मिहराब पाडण्यासाठी सर्वत्र अवलंबत आहेत. आणि खरे पाहता पाकिस्तानच्या संविधानामध्ये असा कोणताच कायदा नाही ज्यात असे उल्लेख आहे की, अहमदींना मिनार बांधण्याची परवानगी नाही आहे. पण सरकारला या तथाकथित मौलवांपुढे गुडघे टेकायला भाग पाडले जाते आणि हे मौलवी इजा करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. परंतु इन्शाल्लाह, एक दिवस हे सर्व स्वतः मरण पावतील.

आमच्या कुरआनच्या प्रकाशनावर पाकिस्तानमध्ये बंदी आहे, त्यामुळे भाषांतराचा प्रश्नच येत नाही. काही लोकांवर गुन्हे दाखल केले आहेत की तुम्ही कुरआन का ऐकत होता. हा तथाकथित मुस्लिमांचा इस्लाम आहे. दुसरीकडे, सर्वशक्तिमान अल्लाह आमच्यासाठी नवनवीन मार्ग उघडत आहे. एका टांझानियन मुअल्लीम साहेबाने सांगितले की, एका व्यक्तीने ३० किलोमीटर दूरवरून फोन केला की त्याला पवित्र कुरआनचे स्वाहिली भाषांतर विकत घ्यायचे आहे. त्यांच्या भागात ते उपलब्ध आहे, असे त्यांना सांगण्यात आले, परंतु त्यांनी सांगितले की मला जमाअतचे भाषांतर आणि भाष्य आवडते आणि मला तेच हवे आहे.

पाश्चात्य जगातही स्वीडन, डेन्मार्कसारखे काही देश पवित्र कुरआनचा अपमान करत आहेत. तिथे इस्लामच्या सुंदर शिकवणी मांडल्या जातात तेव्हा विरोधकांचा दृष्टिकोन बदलतो. आज अहमदिया जमाअत पवित्र कुरआनचा दर्जा उंचावण्यासाठी आणि त्याची शिकवण पसरवण्यात प्रयत्नरत आहे.

पवित्र कुरआनच्या प्रकाशनाबद्दल आणि इस्लामिक शिकवणींवरील साहित्याचा लोकांवर कसा प्रभाव पडतो याबद्दल मी आणखी एक घटना सांगतो. गोलाघाट पुस्तक मेळ्याच्या निमित्ताने शबाना यास्मीन या मुस्लिम प्राध्यापिका यांनी आमचा स्टॉल पाहिला

तेव्हा त्यांना खूप आनंद झाला आणि त्यांनी लगेच येऊन पवित्र कुरआनचा आसामी अनुवाद उचलला आणि आपल्या सहकारी प्राध्यापकांना सांगितले की आज माझे स्वप्न पूर्ण झाले आहे. मी खूप दिवसांपासून पवित्र कुरआनचे आसामी भाषांतर शोधत होते. माझ्याकडे एक शिक्षक होते जो माझ्याकडून पवित्र कुरआनच्या आसामी भाषांतराची वारंवार मागणी करत होते. परंतु माझ्याजवळ तो नसल्यामुळे मी त्यांना ते देऊ शकले नाही म्हणून मला नेहमीच पश्चाताप व्हायचा. आणि माझ्या मुसलमान असण्यावर देखील लाज वाटत होती. माझ्या गुरूच्या मृत्यूनंतर आज मला हे पवित्र कुरआन मिळाले आहे.

बंती दुबारस नावाची एक हिंदू महिला धिमाजी पुस्तक मेळ्यात आली होती. ती शिवमंदिर निर्माण करत आहे आणि त्याविषयी प्रचार करत आहे. आमचा स्टॉल पाहून तिला आश्चर्य वाटले की या भागात एक इस्लामिक स्टॉल आहे जिथे मुस्लिमांची लोकसंख्या खूपच कमी आहे. ती आमच्या स्टॉलवर आली आणि आमच्याशी संभाषण करू लागली. ती खूप आनंदात परतली. दुसऱ्या दिवशी ती परत आली. तिने स्टॉलमधील सर्व लोकांसाठी फळे वगैरे आणली. पवित्र कुरआन पाहून तिला खूप आनंद झाला. पवित्र कुरआन खरेदी करताना म्हणाली की, तुम्ही आज माझ्या आयुष्यातील एक स्वप्न पूर्ण केलात.

शेवटचे धर्मग्रंथ अर्थात पवित्र कुरआन ज्याचे वाचन करणे, ऐकणे हे पाकिस्तानात अहमदियांसाठी निषिद्ध आहे आणि हा एक मोठा गुन्हा आहे. त्याच ग्रंथाद्वारे आज अहमदिया जमाअत जगाला इस्लामचा संदेश देत आहे आणि जगावासींचे प्रबोधन करत आहे. मायक्रोनेशियाचे धर्मोपदेशक शरजील साहिब म्हणतात की काही काळापूर्वी सायमन गॅडन नावाच्या व्यक्तीने जमाअतशी संपर्क साधला आणि पवित्र कुरआनची प्रत मिळवली. जेव्हा ते मशिदीत आले तेव्हा त्यांनी सांगितले की मी आयुष्यभर बायबलचे तपशीलवार वाचन केले आहे. पण प्रयत्न करूनही त्याचं शिक्षण मनाला बसत नाही. मला काहीच समजले (पटले) नाही. पण जेव्हापासून मी पवित्र कुरआन वाचायला सुरुवात केली, तेव्हापासून मला वाटले की त्यातील प्रत्येक शब्द थेट माझ्या हृदयात प्रवेश करत आहे. त्याला आश्चर्य वाटले की मी आयुष्यभर पथभ्रष्ट राहिलो आणि पवित्र कुरआनच्या शिकवणूकींपासून अलिप्त राहिलो. आता ते केवळ जमाअतमध्येच सामील झाले नाही तर मोठ्या धैर्याने इस्लामचा प्रचार प्रसार करत असतात.

महदियाबाद, बुर्किना फासोचे सईद आणि जिका साहिब सांगतात की जेव्हा आमच्या गावातील बहुसंख्य लोकांनी अहमदिया धर्म स्वीकारला तेव्हा आमच्या एका प्रिय व्यक्तीने आम्हाला सौदी अरेबियाला बोलावून काबा दाखवला आणि त्यांना वहाबी धर्म स्वीकारण्यास आणि अहमदिया सोडण्यास सांगितले. मी म्हणालो, या पवित्र स्थानाच्या सावलीत उभे राहून मी प्रार्थना करतो की, माझ्या आयुष्यात अशी कोणतीही संधी येऊ नये की मला अहमदिया सोडावे लागेल. त्याआधी सर्वशक्तिमान अल्लाह मला

विश्वासाच्या स्थितीत मरण देवो. त्यांचा तो शुभचिंतक बुर्किना फासोला भेट देण्यासाठी परत आला, त्यानंतर अल्हाजी इब्राहिम साहेबांनी प्रचार केला आणि तो अहमदी झाला.

नायजेरियात राहणाऱ्या व्यक्तीला अहमदिया धर्म स्वीकारण्याची संधी प्राप्त झाली आली. याआधी ते विरोधी गटातील सक्रिय सदस्य होते. अहमदिया धर्म स्वीकारल्यानंतर त्यांना प्रचंड विरोध सोसावा लागला. एक दिवस ते शेतात काम करत असताना प्रचंड वादळ आले. त्यावेळी विरोधकांचे शब्द त्यांच्या मनात आले की, एक दिवस तू कामावरून परत येशील आणि तुला तुझे घर उद्ध्वस्त झालेले दिसेल. त्यामुळे त्यांनी प्रार्थना केली की हे अल्लाह! जर ही जमाअत तुझी जमाअत आहे आणि हजरत अपेक्षित मसीह तेच वचनबद्ध मसीह व महदी आहेत ज्यांची शुभवार्ता पवित्र पैगंबर (स.) यांनी दिली होती तर माझ्या घराचे रंक्षण कर. ते परत येऊन पाहिले तर त्यांच्या घरातील प्रत्येक खोली सुरक्षित होती, कोणतेही नुकसान झाले नाही. याउलट  आजूबाजूची सर्व घरे उद्ध्वस्त झाली होती. हे पाहून त्यांना खात्री पडली की ही खचितच ईश्वरीय जमाअत आहे.

हजरत अपेक्षित मसीहसाठी अल्लाहचे समर्थन जगाच्या विविध ठिकाणी पहायला मिळतात, ज्यांनी आमच्यासमक्ष अस्सल इस्लाम दाखवून दिला आणि त्यांच्या सुंदर अशी शिकवण प्रदर्शित केली. या सर्व घटना अहमदियाच्या सत्याचा पुरावा आहेत आणि लोकांचा विश्वास दृढ करत आहेत. अल्लाह लोकांचे मन व काळीज याकडे प्रेरित करो आणि श्रद्धेत प्रगती करण्याचे सामर्थ्य प्रदान करो.

हुजूर अनवर म्हणाले की, या दिवसात कोविड महामारी पुन्हा पसरत आहे, लोकांनी सावधगिरी बाळगली पाहिजे.

प्रवचनाच्या शेवटी हुजूर अनवर यांनी चार मृत पावलेल्या अहमदींचा उल्लेख केला आणि शुक्रवारच्या प्रार्थनेनंतर यांची नमाज ए जनाजा अदा करण्याची घोषणा केली.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ
اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ.
عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَأْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ
لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔